**मोटार अपघात दावा क्र. ३६/२०२५**

**निशाणी ५६ खाली**

अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ५ यांची साक्ष
मी शपथेवर कथन करतो की,
**माझे नाव** – धनाजी शशिकांत मुळे
**वय** – ४० वर्षे, **धंदा** – नोकरी, आस्थ हॉस्पीटल, सोलापूर
**राहणार** – कोष्टी नगर, डोणगांव रोड, सोलापूर

**सरतपास अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. सी. महेंद्रकर**

१. मी आस्था हॉस्पीटल येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. मला साक्षीसमन्स मिळाले आहे. (आता साक्षीदाराला निशाणी क्र. ४५ वरील अधिकारपत्र दाखविण्यात आले.) त्यावर निलरोहित पैके यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी अर्जदार यांना ओळखतो. अर्जदार आमच्याकडे औषधोपचारासाठी दाखल होत्या. (आता साक्षीदाराला यादी निशाणी क्र. ५५/१ व २ वरील समरी बिल आणि मेडीकल बिल दाखविण्यात आले) त्यावर पुनम घोडके यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर बिलांना **निशाणी क्र. ५७ व ५८** देण्यात येते.) सदर बिलाची रक्कम आम्हाला मिळालेली आहे.

सरतपास समाप्त

**उलटतपास सामनेवाला क्र.२ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम.व्ही. पाटील**

२. हे खरे आहे की, साक्षीसमन्स माझ्या वैयक्तीक नावाने नाही. हे खरे नाही की, मी अधिकारपत्र दाखल केलेले नाही. पुनम घोडके आमच्या दवाखान्यात असून साक्षीला येवू शकतात. आमच्या मेडीकल मध्ये घोडके मॅडमसह इतर ४ जण आहेत. हे खरे आहे की, आम्ही रुग्णाला वैयक्तीक ओळखत नाही. या बिलाची रक्कम कोणी अदा

केली हे मला सांगता येत नाही. बिलावर बिल देणाऱ्याची सही किंवा नांव नमूद नाही. प्रत्येक बिलाची रक्कम माझ्यासमक्ष देण्यात आलेली नाही. हे खरे नाही की, अर्जदाराच्या सांगण्यावरुन मी खोटे बीलं दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**सामनेवाला क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. कालेकर यांनी उलटतपास नाकारला.**

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

PATIL OMSHANKAR SHIVRAJ

Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2026.07.29 14:04:57 +0530

**(ओमशंकर शिवराज पाटील)**

दिनांक – २९.०७.२०२६ तदर्थ जिल्हा न्यायाधीश – २, सोलापूर.